# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता. जि. ठाणे. : ४०१ १०१

जा. क्र. मनपा/परि/३३४/२०१९-२० दि. ११/०२/२०२०

मिरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन विभागासाठी ठोक मानधनावर नियुक्तीसाठी

## थेट मुलाखती (Walk in Interview)

आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका हे, महानगरपालिकेच्या परिवहन विभागासाठी खालील पदांच्या तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावरील जागा मुलाखतीद्वारे थेट मुलाखती (Walk in Interview) भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांना अर्जासाठी विनंती करीत आहेत. खालील नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी, विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या सांक्षांकित प्रतींसह दि. ०४/०३/२०२० रोजी स. ११.०० वा. मा. अतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालयात, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

**उपलब्ध पदसंख्या**

| अ.क्र | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| १. | ऑपरेशन मॅनेजर (बस ऑपरेशन) ठोक मानधनावर (रु. ६०,०००/- सर्व भत्त्यांसह) | ०१ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेचा पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२) परिवहन उपक्रमामध्ये किमान १०० बसचा ताफा असलेल्या उपक्रमामध्ये डेपो मॅनेजर/ऑपरेशन मॅनेजर/डेपो सुपरिटेंडन्ट म्हणून वा तत्सम कामाचा किमान १५ वर्षांचा अनुभव.<br>३) मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |
| २. | ITS ऑफिसर (ITS मॅनेजर) ठोक मानधनावर (मासिक रु. ५५,०००/- सर्व भत्त्यांसह) | ०१ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची इलेक्ट्रॉनिक्स/कॉम्प्युटर/ इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी अथवा तत्सम समकक्ष अभियांत्रिकी शाखेची पदवी उत्तीर्ण.<br>२) बस इन्टेलिजन्स ट्रान्सपोर्ट सिस्टिम (ITS) संबंधी कामाचा वा तत्सम कामाचा किमान ०५ वर्षांचा अनुभव<br>३) मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |

**अटी - शर्ती :-**

१) सदर कामासाठी ठोक मानधन पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त ०६ महिन्यांसाठी देण्यात येईल. आवश्यकता असल्यास अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरिता नूतनीकरण करता येईल. अथवा पुन्हा नव्याने नियुक्तीची प्रक्रिया करण्यात येईल.

२) नियुक्तीच्या कालावधीत ठोक मानधनावर सदर काम पूर्ण करण्यास जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व तसे हमीपत्र / बंधपत्र घेण्यात येईल.

३) ठोक मानधनावर नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास महानगरपालिकेच्या / शासनाच्या कोणत्याही संवर्गातील सेवा समावेशनाबाबत / सामावून घेण्याबाबतचा अधिकार हक्क नसेल.

४) इच्छुक व पात्र उमेदवारांनी जाहिरातीमधील नमूद केलेल्या शैक्षणिक पात्रता / अर्हता तसेच अनुभव प्रमाणपत्र मूळ प्रती व दोन छायांकित प्रतीचे संचासह उपस्थित रहावे.

**निवड प्रक्रिया :-**

- प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

सही/-
(डॉ. सुनिल लहाने)
अति. आयुक्त तथा परिवहन व्यवस्थापक
परिवहन उपक्रम
मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र.मनपा/जनसंपर्क/४९७/२०१९-२०
दि. ११/०२/२०२०

MajhiNaukri.ORG.IN

www.majhinaukri.org.in